# दि महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि., मुंबई

(शेड्युल्ड बँक)

सर विठ्ठलदास ठाकरसी स्मृती भवन, ९, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स लेन, फोर्ट, मुंबई ४०० ००१

फोन.नं. +९१-०२२-६९८०-११५१, ११७२, ११७८

Website: https://msc.bank.in


## शुध्दीपत्रक

**(चल व अचल मालमत्ता विक्रीसाठीची / भाडेतत्वाची निविदा सुचना)**

दि महाराष्ट्र स्टेट को-ऑप.बँक लिमिटेड., मुंबई यांचेमार्फत "सेक्युरिटायझेशन अॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल अॅसेट्स अॅन्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट (सरफेसी) अॅक्ट, २००२" नुसार ०३ सहकारी सूत गिरण्या, ०१ सहकारी साखर कारखाना, ०१ मार्केटींग कंपनी व ०१ वैद्यकिय संस्था अशा एकूण ०६ कर्जदार संस्थांच्या **मालमत्ता विक्रीसाठी** मोहरबंद निविदा मागविणेस्तव दि.०८.०४.२०२६ रोजी निविदा सुचना प्रसिध्द करण्यात आली आहे. त्यामध्ये **स्वामी समर्थ सहकारी साखर कारखाना लि., दहिटणे, ता.अक्कलकोट, जि. सोलापूर** या संस्थेच्या **मालमत्ता विक्रीसाठी** मा. डी. आर. टी., पुणे येथील दावा क्र. एस.ए.४९०/२०२५ या दाव्यातील आदेशास अधीन राहून मोहरबंद निविदा मागवित आहोत, असे नमूद आहे.

स्वामी समर्थ स. सा. का. लि. ही संस्था **भाडेतत्वावर घेणेस्तव देखील** मोहरबंद निविदा मागवित आहोत, असे या शुध्दीपत्रकाद्वारे स्पष्ट करीत आहोत. विक्रीस्तव प्राप्त होणाऱ्या निविदांना प्राधान्य दिले जाईल. भाडेतत्वानुषंगाने अटी/शर्ती तसेच माहिती व निविदा बँकेच्या संकेतस्थळावर (https://msc.bank.in) उपलब्ध आहे. दि.०८.०४.२०२६ रोजीच्या जाहिरातीतील निविदा प्रक्रियेचा तपशिल कायम असेल, कृपया याची नोंद घ्यावी.

**अ) विक्रीने/भाड्याने द्यावयाच्या संस्था** (रु.लाखात)

| अ क्र | संस्थेचे नांव | क्षमता | किमान अपेक्षित भाडे रक्कम (फिक्स भाडे अधिक टॅगिंग प्र.मे.टन) | मालमत्ता तपशील | विक्रीसाठी राखीव किंमत | बयाना रक्कम विक्रीसाठी (इ.एम.डी.) १० % | बयाना रक्कम भाडया साठी (रु. लाखात) | दि.३१.०३.२६ अखेरील येणेबाकी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | स्वामी समर्थ सहकारी साखर कारखाना लि., दहिटणे, ता.अक्कलकोट, जि.सोलापूर | २५०० टीसीडी | निविदेमध्ये नमुद केल्याप्रमाणे | जमीन ७६.७३ हे. आर. बिल्डींग, प्लॅन्ट अॅण्ड मशिनरी | ६०९७.०० | ६०९.७० | ८८.३३ | १३६०.७४ |

**भाड्यासाठीच्या अटी खालील प्रमाणे –**

१. उपरोक्त मालमत्ता 'जशी आहे आणि जिथे आहे, ज्या स्थितीत आहे त्या स्थितीत' अशा अटींवर संस्थेच्या ज्ञात व अज्ञात देयतेसह भाड्याने देणेस्तव बँकेतर्फे जाहिरात देण्यात येत आहे. सदर मालमत्तेविषयी सर्व देयतेसंबंधी माहिती घेणेस्तव डयु डिलीजन्स करुन संस्थेच्या सर्व देयतेची खात्री स्वतःच्या स्तरावरुन स्वखर्चाने करणेची जबाबदारी खरेदीदाराची राहिल.

२. संस्थेची भाडे निविदा, निविदेत नमूद भाडे रक्कमेपेक्षा तसेच टेंडर फॉर्ममध्ये नमुद फिक्सभाडे व टॅगींग भाडे रक्कमेपेक्षा जादा असणे तसेच निविदा विनाअट असणे आवश्यक आहे. निविदा भरताना ही बाब लक्षात घेणे जरुरीचे आहे.

३. भाड्याच्या निविदेसाठी अनामत (ई.एम.डी.) रकमेचा भरणा बँकेत निविदा सादर करणेपूर्वी आरटीजीएसद्वारे (RTGS/NEFT: IFSC:MSCI0082002, A/c No. 000211690000010, A/c. Name- DIRR, Head office) दि महाराष्ट्र स्टेट को. ऑप. बँक लि., मुंबई येथे जमा करणे आवश्यक आहे.

४. भाड्याची निविदा पुस्तिका (बीड टेंडर डॉक्युमेंट) बँकेचे मुख्य कचेरी, मुंबई येथील डीआयआरआर विभागाच्या व्यवस्थापिका, तसेच प्रादेशिक कार्यालय, पुणे येथील व्यवस्थापकांकडे दि.११.०४.२०२६ ते दि.०७.०५.२०२६ या दरम्यान कार्यालयीन दिवशी (सार्वजनिक सुट्टी व्यतिरिक्त) सकाळी १०:०० ते

सायंकाळी ५:०० या वेळेत मिळतील. तसेच निविदा पुस्तिका (बीड टेंडर डॉक्युमेंट) बँकेच्या बेबसाईटवरुनही (https://msc.bank.in) डाऊनलोड करुन भरता येतील. मात्र डाऊनलोड केलेल्या निविदा /टेंडर बँकेत सादर/दाखल करणेपूर्वी विक्री/भाडे टेंडर डॉक्युमेंटपोटी फॉर्म फी रु.२९,५००/- (जी.एस.टी.सह) एन.ई.एफ.टी.द्वारे भरणे आवश्यक राहील.

५. टेंडर उघडण्याच्या दिवशी ५ पेक्षा जास्त निविदा प्राप्त झाल्यास, नमूद भाडे रक्कमेच्या राखीव किंमतीपेक्षा जास्त रकमेच्या निविदा असणाऱ्या प्रथम ३ क्रमांकाच्या निविदा धारकांना एकत्रित बसवून सर्वांसमक्ष जास्तीत जास्त बोली लावण्याची संधी दिली जाईल. त्यापैकी जास्तीत जास्त बोली लावणाऱ्या निविदाधारकाची निविदा, त्यांनी लावलेल्या बोलीची रक्कम फेरनिविदा म्हणून घेण्यात येईल. तसेच ५ पेक्षा कमी निविदा प्राप्त झाल्यास सर्व पात्र निविदाधारकांना एकत्रित बसवून सर्वांसमक्ष जास्तीत जास्त बोली लावण्याची संधी दिली जाईल. सदरची बोली निविदाधारकाने किमान रु.१०.०० लाख व त्यापटीत वाढवावयाची आहे. तथापि एकदा दिलेला देकार कोणत्याही परिस्थितीत कमी करता येणार नाही.

६. निविदा सादर/दाखल करावयाची अंतिम तारीख दि.०७.०५.२०२६ (सायंकाळी ५:०० पर्यंत) राहील. निविदा मुख्य कचेरी, तिसरा मजला, सर विठ्ठलदास ठाकरसी स्मृतीभवन ९, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स लेन, फोर्ट, मुंबई ४००००१ येथे ठेवलेल्या निविदा ड्रॉप बॉक्समध्ये दाखल कराव्यात.

७. इच्छूक निविदाधारक दि.१५.०४.२०२६ ते दि.१६.०४.२०२६ या दिवशी कार्यालयीन वेळेत सकाळी १०:०० ते सायंकाळी ५:०० पर्यंत संस्था स्थळी भेट देवून मालमत्तेची पाहणी करु शकतात.

८. सर्व इच्छुक खरेदीदार निविदाधारकांनी संस्थेचे **ड्यु डिलिजन्स** स्वतः, स्वखर्चाने करुन घ्यावयाचे आहे.

९. निविदाधारकाने संस्था भाड्याने घेण्यासाठी टेंडर भरले म्हणजे निविदाधारकास संस्थेची पूर्वीची, चालू भविष्यातील सर्व देणी , कर्ज इत्यादी बाबतची पूर्ण माहिती आहे असे गृहित धरले जाईल.

१०. निविदाधारकाने सही शिक्क्यानिशी निविदा सादर केली म्हणजे निविदाधारकाने निविदेमधील सर्व अटी/शर्ती वाचल्या असून त्या त्यांना मान्य आहे असे गृहित धरले जाईल. तद्नंतर निविदाधारकाने कोणत्याही अटी/शर्ती शिथिल करणेबाबत मागणी केल्यास त्यांनी सादर केलेली निविदा रद्द केली जाईल व त्यांनी भरणा केलेली ईएमडीची रक्कम जप्त करण्यात येईल.

११. टेक्निकल बीड निविदाधारक किंवा त्यांच्या प्रतिनिधीसमोर उपरोक्त नमुद तपशिलाप्रमाणे नमुद संस्थेच्या दिलेल्या तारीख व वेळ (दि.०८.०५.२०२६) नुसार उघडण्यात येतील.

१२. निविदेतील अटी/शर्ती प्रमाणे निविदाधारकाने संपूर्ण कागदपत्रे टेक्निकल बीड सोबत सादर करणे आवश्यक आहे. निविदेतील अटीनुसार निविदाधारकाच्या निकषास पात्र होणाऱ्या निविदाधारकांचे फायनान्शीअल बीड उघडण्यास पात्र ठरतील.

१३. टेक्निकल बीड अपात्र झालेल्या निविदाधारकास त्यांची निविदा अपात्र झाल्याबाबत कळविण्यात येईल व त्यांनी भरणा केलेली ईएमडीपोटीची रक्कम (बिनाव्याजी) परत करण्यात येईल.

१४. पात्र निविदाधारकांच्या उच्चतम निविदा बँकेच्या मा.प्रशासक कार्यकारी सभेसमोर अंतीम करण्यासाठी ठेवण्यात येतील व त्याप्रमाणे यशस्वी निविदा धारकास कळविण्यात येईल.

१५. भाडयाच्या यशस्वी निविदाधारकास भाडेकरार नोंदणीकृतकरणे, मुद्रांक शुल्क भरणे व करार नोंदणीचा इत्यादी सर्व खर्च स्वतःला करावा लागेल. तसेच विक्रीच्या यशस्वी निविदाधारकास मालमत्ता स्वतःच्या नावावर करुन घेण्यासाठी, सेल सर्टिफिकेट नोंदणीकृत करणेसाठी लागणारा खर्च उदा. मुद्रांक शुल्क व नोंदणी शुल्क इत्यादी सर्व खर्च स्वतःला करावा लागेल.

१६. मालमत्ता भाड्याने देणेचे अधिकार सरफेसी कायदा-२००२ अंतर्गत प्राधिकृत अधिकारी यांना प्राप्त आहेत. त्यानुसार कोणतेही कारण न देता कोणतीही निविदा स्विकारण्याचा/रद्दबातल ठरविण्याचे, पुढे ढकलण्याची, संपूर्ण निविदा प्रक्रिया रद्द करण्याचे अधिकार बँकेच्या प्राधिकृत अधिकारी यांना राहतील.

१७. आणि बँकेच्या संकेत स्थळावर प्रसिध्द केलेल्या भाडे निविदेत नमुद इतर सर्व अटी/शर्ती .

**वैधानिक नोटीस**

कर्जदार आणि जामिनदार यांना सूचित करण्यात येते की, राज्य सहकारी बँकेच्या एकूण कर्ज येणेबाकीचा भरणा निविदा प्रक्रियेपुर्वी करावा. अन्यथा जप्त मालमत्ता भाडे तत्वावर देवून कर्ज वसुली केली जाईल. तसेच भाडे प्राप्त रकमेतून संपूर्ण कर्ज वसुली न झाल्यास उर्वरित कर्जबाकी व्याज व इतर खर्चासह आपणांकडून वसुली केली जाईल याची नोंद घ्यावी. सदर सूचना आमच्या मागील संबंधीत भाडे तत्वाच्या जाहीरातीद्वारे आधीच देण्यात आली होती. त्यामुळे वैधानिक तरतूदीचे पालन केले आहे.

सही/-

**( दिलीप एन. दिघे)**

**व्यवस्थापकीय संचालक तथा प्राधिकृत अधिकारी**

**दि महाराष्ट्र स्टेट को.ऑप.बँक लि., मुंबई**

**दिनांक :** ११.०४.२०२६

**ठिकाण :** मुंबई